# LOKNAYAK

THE DIGITAL NEWSPAPER




लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ आचार्य पदवी संशोधन केंद्रसत्र 2020..2021 केंद्रप्रमुख... प्राचार्य डॉक्टर दुर्गेश कुंटे
संशोधक मार्गदर्शक - 1 डॉ कविता तातेड इतिहास, 2 डॉ लता वाघेला गृह अर्थशास्त्र, 3 डॉ सुधा खडके समाजशास्त्र, 4 अर्चना देशपांडे संगीत

## अणे महिला महाविद्यालयात आचार्य पदवी संशोधन तंत्र कार्यशाळा संपन्न

------------

स्थानिक लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंतीचे औचित्य साधून नवोदित संशोधकांसाठी आचार्य पदवी संशोधन तंत्र कार्यशाळा घेण्यात आली . अमरावती विद्यापीठ मान्यताप्राप्त महाविद्यालयातील पीएचडी रिसर्च सेल आणि आय क्यू ए सी च्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉक्टर दुर्गेश कुंटे यांनी केले. संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संशोधन विषयाची निवड कशी करावी याबाबत ही कार्यशाळा उपयोगी ठरणार असून समाजाभिमुख संशोधन ही व्यक्ती महत्त्वाची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. इतिहास, गृह अर्थशास्त्र , समाजशास्त्र व संगीत विभागात आचार्य पदवी संशोधन केंद्राचे कार्य समाधानकारक रीत्या सुरु असून पदवीत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी संशोधन पद्धती शास्त्र बाबत माहिती मिळून घेण्याचे आवाहन त्यांनी केले . कार्यशाळेचे साधन व्यक्ती व मार्गदर्शक म्हणून डॉक्टर राजेश चंद्रवंशी यांनी दोन सत्रातुन संशोधन आराखडा स्वरूप आणि विषयाची निवड याबाबत तपशिलासह विश्लेषण केले. संशोधकांनी संशोधन आराखडा तयार करताना गृहीतके यांची मांडणी संदर्भ साधने उद्देश व शोध कार्याचे महत्त्व याबाबत भूमिका मांडत असताना विषयाची निवड त्याची प्रासंगिकता उपयोगिता यांच्यातील सहसंबंध यावर प्रकाश टाकला.

ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेल्या कार्यशाळेची तांत्रिक बाजू यशस्वीपणे सांभाळून प्राध्यापक वगारे यांनी प्रथम सत्राचे सूत्रसंचालन केले कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात प्राध्यापक डॉक्टर राजश्री धर्माधिकारी यांनी संशोधन आणि संशोधनाचा विषय याबाबत मांडणी करताना वस्तुनिष्ठता हा संशोधनाचा आधार असल्याचे मत व्यक्त केले. प्राध्यापक डॉक्टर लता वाघेला यांनी कार्यशाळेचा समारोप करताना संशोधक आणि संशोधन कार्य याबद्दल विचार मांडले. या नावीन्यपूर्ण कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक डॉक्टर कविता तातेड प्राध्यापक डॉक्टर सुधा खडके प्राध्यापक डॉक्टर अर्चना देशपांडे प्राध्यापक डॉक्टर लता वाघेला प्राध्यापक विराट घुडे प्राध्यापक ज्ञानेश्वर गटकर प्राध्यापक वगारे यांनी परिश्रम घेतले.

## अणे महिला महाविद्यालय मधील संशोधक विद्यार्थ्यांचे सुयश

अणे महिला महाविद्यालयातील आचार्य पदवी संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थ्यांचे सुयश .

यवतमाळ येथील अणे महिला महाविद्यालयातील आचार्य पदवी रिसर्च सेंटरला कोर्सवर्क पूर्ण करून संशोधक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. एकूण वीस विद्यार्थी या परीक्षेला बसले होते यामध्ये इतिहास, समाजशास्त्र गृह -अर्थशास्त्र ,इंग्रजी ,अर्थशास्त्र व संस्कृत या विषयाचा समावेश होता. कोर्सवर्क तासिका पद्धतीने पूर्ण करण्यात आला. पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांसाठी संगाबा विद्यापीठाने कोर्सवर्क पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती.या परीक्षेमध्ये लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील सेंटरचे वीस विद्यार्थी परीक्षेला बसले होते हे विद्यार्थी अत्यंत चांगल्या गुणांनी ही परीक्षा पास झाले असून ,रिसर्च सेंटर चा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. आचार्य पदवी रिसर्च सेंटरचे केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ.दुर्गेश कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभाग प्रमुख डॉ.कविता तातेड ,गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.लता वाघेला तसेच समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुधा खडके यांनी या कोर्स वर्कचे आयोजन केले होते. या कोर्स वर्कच्या माध्यमातून मार्गदर्शक म्हणून त्यांनी हे काम पाहिले यामध्ये ऑनलाईन टेस्ट घेणे ,पेपर सोडवून घेणे, पीपीटी प्रेझेन्टेशन घेणे ,सेमिनार घेणे या पद्धतीने एकूण पाच मॉडुयलमध्ये विविध पद्धतीने त्यांची अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेऊन त्यांना गुणदान करण्यात आले .आचार्य पदवी रिसर्च सेंटरच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती शास्त्र कार्यशाळा ,सर्वेक्षण पद्धतशास्त्र याबाबत तज्ञांचे मार्गदर्शन सीनॉपसिस तयार करण्यासाठी लागणारे स्किल याविषयी मार्गदर्शकांनी कार्यशाळा घेऊन, विद्यार्थ्यांना विविधांगी माहिती दिली .संशोधक मार्गदर्शकांनी संशोधनाचा आराखडा ,संशोधनाची तत्वे, गृहीतके, सर्वेक्षण याविषयी विविध तासिका घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ,आचार्य पदवी रिसर्च सेंटरच्या या भरघोस मिळालेल्या यशाबद्दल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. दिवाकरराव पांडे, सचिव श्री. रानडे सर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, केंद्रप्रमुखांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले .आमच्या महाविद्यालयासाठी ही गौरवाची बाब आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले .संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन कार्यासाठी व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



संशोधक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करताना मार्गदर्शक डॉ. कविता तातेड, डॉ. लता वाघेला, सुधा खडके, अर्चना देशपांडे

## कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मान्यवर –







## कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. कुंटे –






## सेमिनार मध्ये सहभागी संशोधक विद्यार्थी -










# संशोधक विद्यार्थ्यांना गुणपत्रका प्रमाणपत्र वितरण –









# सहभागी संशोधक विद्यार्थी –


















Samsung Triple camera


REDMINOTE 9 PRO MAX
AI QUAD CAMERA


2021/1/7 12:38


Education Society's
Loknayak Bapuji Aney
Mahila Mahavidlaya, Yavatmal
Under the aegis of IQAC
Ph. D. Research Centre
Humanities And Social Sciences
2021/2/17 12:11


Sant Gadge Baba Amravati university
Education Society's
Loknayak Bapuji Aney
Mahila Mahavidlaya, Yavatmal
Under the aegis of IQAC
Ph. D. Research Centre
2021/2/17 12:12